वाचले:-१) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.पंस/जिग्राविय/१३५१/१८, दि. २३/१०/२०१८ अन्वये तहसिलदार पुरंदर यांचेकडे केलेला विनंती अर्ज.

२) तहसिलदार पुरंदर यांचेकडील अहवाल पत्र क्र. जमीन/कावि/१०२२/१८, दि.१९/११/२०१८.

३) उपविभागीय अधिकारी दौंड-पुरंदर यांचेकडील पत्र क्र. जमिन मागणी / एसआर/२५/१८, दि.२०/११/२०१८.

४) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र. क्र. २१३/ज-१, दि. १९ सप्टेंबर, २०१६

५) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४०.

६) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट नियम १९७१) नियम ५.

---

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
महसूल शाखा
क्र. पमग/सीआर/०३/२०१९
दिनांक- २०/०२/२०१९

विषय - जमीन-पुणे

**मौजे जेऊर, ता.पुरंदर, जि. पुणे येथील गायरान जमीन ग. नं.१४५ पैकी ० हे. ६.५ आर (६५०.०० चौ.मी.) जागा केंद्र शासनाच्या "*प्रधानमंत्री आवास योजना सर्वासाठी घरे २०२२*" योजनेअंतर्गत घरे बांधण्यासाठी प्रदान करणेबाबत..**

**गट विकास अधिकारी, पंचायत समिती पुरंदर यांची मागणी**

आदेश

ज्याअर्थी, शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.२१३/ज-१ दिनांक १९ सप्टेंबर २०१६ मधील तरतुदीनुसार "*प्रधानमंत्री आवास योजना सर्वासाठी घरे २०२२*" या योजने अंतर्गत गरीबांना स्वस्त दरात घरे उपलब्ध होण्यासाठी **मौजे जेऊर, ता. पुरंदर, जि. पुणे येथील गायरान जमीन ग. नं.१४५ पैकी ० हे. ६.५ आर (६५०.०० चौ.मी.)** जागा मिळण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर यांनी तहसिलदार पुरंदर यांचेकडे विनंती अर्ज केला आहे.

२. ज्याअर्थी, तहसिलदार पुरंदर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/१०२२/१८, दि.१९/११/२०१८ अन्वये चौकशी करुन उपविभागीय अधिकारी, दौंड-पुरंदर यांचे मार्फत पत्र क्र. जमिन मागणी/एसआर/२५/१८, दि.२०/११/२०१८ अन्वये अहवाल सादर केला असून जागा वाटप करणेस हरकत नसलेबाबत नमुद केले आहे.

३. ज्याअर्थी ग्रामपंचायत जेऊर, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे यांनी त्यांचेकडील ग्रामसभेचा ठराव क्र. १६, विषय क्र. १६ दिनांक:- २०/१०/२०१८ अन्वये मौजे जेऊर येथील गट नंबर १४५ पै. ० हे ६.५ आर जागा प्रधानमंत्री आवास योजनेकरिता (ग्रामीण) देणेस सहमती दर्शविली आहे.

४. ज्याअर्थी, मंडल अधिकारी वाल्हा यांचे दि. ३१/१०/२०१८ रोजीच्या पंचनाम्यानुसार, सदर गट नं १४५ ही जमीन संपुर्ण पड असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम नाही. कब्जेदार सदरी सरकारी गायरान असे नमुद आहे. जमीनीच्या मध्यभागी पहाणी केली असता संपुर्ण जमीन ही चढउतार आहे. सदर जमीन ही जेऊर गावापासून १.५ कि. मी. आहे. सदर जागेमध्ये येण्याजाण्यासाठी रस्ता नसुन बैलगाडी रस्ता आहे. सदर जमीन ही मानसवस्ती राहण्यासाठी योग्य आहे. असे नमुद आहे.

५. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.२१३/ज-१ दिनांक १९ सप्टेंबर २०१६ मधील महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ कलम ४० आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम १९७१ च्या नियम ५ मधील तरतुदीनुसार केंद्र पुरस्कृत "प्रधानमंत्री *आवास योजना-सर्वांसाठी घरे २०२२"* या योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पासाठी आवश्यक असलेली शासकीय जमीन अंमलबजावणी यंत्रणांना प्रदान करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये *"प्रधानमंत्री आवास योजना- सर्वांसाठी घरे २०२२"* या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच्या मंजूर गृहनिर्माण प्रकल्पासाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणजेच म्हाडा, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर शासकीय निमशासकीय संस्था यांना आवश्यक असलेली आणि निर्बाधरित्या वाटपासाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन रुपये १/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने कब्जेहक्काची किंमत वसूल करुन संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेस भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर प्रदान करण्यात यावी अशी तरतुद आहे.

६. ज्याअर्थी, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार **गट विकास अधिकारी, पंचायत समिती पुरंदर** यांनी सदर योजनेकरीता उक्त मागणी केलेल्या ६५० चौ. मी.जमीनीची प्रती चौ. मी. १/- या प्रमाणे रक्कम ६५०/- इतकी रक्कम शासनास जमा करुन चलन क्रमांक MH०१०६२७२३७२०१८१९M, दि. १५/०१/२०१९ रोजीचे डिफेस चलन नंबर ०००६६४७४५७२०१८१९, दि. १५/०२/२०१९ चलन सादर केले आहे.

**७. त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४० व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट नियम १९७१) नियम ५ अन्वये, मी नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, पुणे शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.२१३/ज-१ दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये मौजे जेऊर, ता. पुरंदर, जि. पुणे येथील गायरान जमीन ग. नं. १४५ पैकी ० हे. ६.५ आर (६५०.०० चौ.मी.) जागा प्रती चौ. मी. रु. १/- या नाममात्र दराने कब्जेहक्काची रक्कम वसुल करुन भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारान्वये कब्जेहक्काने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर, जि. पुणे यांना *"प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२"* या योजनेसाठी खालील अटी व शर्तीवर प्रदान करण्यात येत आहे.**

## अटी व शर्ती

१) विषयांकीत मंजूर करण्यात आलेली जमीन प्रतिग्रहिता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर, जि. पुणे हे भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण करतील.

२) प्रस्तुत कामी दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील अट क्र. ३ नुसार सदर जमिनीचा मंजूर प्रयोजनासाठी विकास झाल्यानंतर त्यावरील सदनिका धारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे उक्त जमीन रु.१/- या नामामत्र वार्षिक भुईभाडयाने एकावेळी ३० वर्षापेक्षा जास्त होणार नाही अशा कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्याचे अधिकार संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा **गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर, जि. पुणे** यांना राहतील. संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्था जिल्हाधिकारी यांचे पूर्वपरवानगी शिवाय उक्त जमीन हस्तांतरीत करणार नाही अथवा गहाण /तारण / हस्तांतरण करणार नाही. आणि अशा प्रस्तावित हस्तांतरणावर शासनाच्या महसूल व वन विभागाच्या प्रचलित आदेशातील तदतुदीनुसार अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा वसूल केल्याखेरीज अशा जमिनीच्या कोणत्याही हस्तांतरण प्रस्तावास मान्यता देता येणार नाही. त्याचप्रमाणे अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कोणत्याही सदस्याकडून होणाऱ्या त्यांच्या सदनिकेया हस्तांतरणापोटी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार हस्तांतरण शुल्क शासन जमा करणे अनिवार्य राहील. तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कोणत्याही सदस्यास

जिल्हाधिकाऱ्यांच्या अथवा शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याच्या लेखी पूर्वानुमतीशिवाय त्याची सदनिका गहाण ठेवता येणार नाही.

३) सदर केंद्र पुरस्कृत *"प्रधानमंत्री आवास योजना सर्वासाठी घरे २०२२"* या योजनेनुसार उक्त जागेतील अस्तित्वातील अतिक्रमण धारकांचे पात्रतेनुसार घरे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर, जि. पुणे यांची राहील.

४) सदर जागेच्या नियोजनाच्या दृष्टीने सक्षम नियोजन प्राधिकारी यांचेकडील अभिप्राय घेवुन रेखांकन /बांधकाम परवानगी घेणेचे सर्वस्वी जबाबदारी प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

५) पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी घोषीत केलेल्या रिंग रोड मध्ये सदर क्षेत्र बाधित होत नाही याबाबतची खात्री करण्याची जबाबदारी प्रतिग्रहीता व सक्षम नियोजन प्राधिकारी यांचेवर बंधनकारक राहील.

६) उक्त जमीनीचा ताबा घेतल्यानंतर दोन वर्षाचे आत दिलेल्या प्रयोजनासाठी जागेचा वापर सुरु करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

७) सदर जमीन ही गायरान संवर्गातील असल्याने शासन निर्णय क्र. जमीन ०३/२०११/ प्र.क्र.५३/ ज-१ दि.१२ जुलै, २०११ मधील तरतुदीनुसार मा. मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद यांची शिफारस घेणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

८) सदर जागेवरील नियोजीत योजनेच्या बांधकामासाठी नियोजन प्राधिकारी म्हणून पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण (PMRDA) यांची मंजूरी घेण्यात यावी.

९) सदर जागेवर पर्यावरणाच्या पुनर्स्थापनेसाठी व पर्यावरण संतुलन कायम राखण्याच्या दृष्टीने विषयांकित जागेत आवश्यक तेथे वृक्ष लागवड करणे व त्यांची जोपासणा करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

१०) विषयांकीत जागेबाबत शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-०५/२००६/प्र.क्र.४३/ज-१, दि.३१ ऑक्टोबर, २००६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार करारनाम्याचा दस्त निष्पादित करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

११) प्रतिग्रहीता यांनी उक्त जमीन ताब्यात घेतल्यानंतर नमुना १८ प्रमाणे जागेस नावाचा बोर्ड लावण्यात यावा.

१२) प्रस्तुत जमिनीचा ताबा घेताना प्रतिग्रहीता यांनी विहीत नमुन्यातील सनद करुन घ्यावी.

१३) प्रस्तुत जागेतुन लघु अथवा उच्च दाबाची विद्युतवाहीनी जात नसलेबाबत खात्री करणेची सर्वस्वी गट विकास अधिकारी, पंचायत समिती पुरंदर यांची राहील.

१४) प्रकरणी गायरान जमीन वाटपाचे अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांची शिफारस घेणे आवश्यक राहील.

१५) प्रतिग्रहीता यांनी सदर आदेशातील वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१४५/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र जमीनीचा ताबा घेण्यापूर्वी सादर करावे.

१६) प्रतिग्रहित्याने उपरोक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जमीन विना मोबदला सरकार जमा होण्यास पात्र राहील.

सही/xxx
(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी पुणे

प्रति,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पुरंदर, जि. पुणे

प्रत:- १) मा. उपसचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.

३) उपविभागीय अधिकारी दौंड-पुरंदर.

४) तहसिलदार पुरंदर.

२/- प्रस्तूतचे आदेशातील अट क्र. १५ मध्ये सूचित केलेप्रमाणे उक्त जमीनीचा ताबा देणेपूर्वी आदेशातील सर्व अटी मान्य असलेबाबत प्रतिग्रहिता **गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर, जि. पुणे** यांचेकडून प्रथमत: हमीपत्र घेणेत यावे व तद्नंतर मौजे जेऊर, ता. पुरंदर येथील गट नंबर १४५ पै. ० हे ६.५ आर (६५०.०० चौ. मी.) क्षेत्राचा ताबा प्रतिग्रहिता यांस देवून त्याच्या योग्य नोंदी गावचे दप्तरी घेवून त्यानुसार दुरूस्त ७/१२ उतारा, जागेचा पंचनामा, ताबे पावती, जागेचा नकाशा यासह पुर्तता अहवाल सादर करावा. तसेच या आदेशातील अट क्र. १ प्रमाणे ७/१२ वर योग्य त्या नोंदी घेणेस सूचित करावे. सोबत मुळ संचिका पान क्र. १ ते असे.

५) ग्रामपंचायत जेऊर, ता. पुरंदर, जि. पुणे.

६) उपअधिक्षक भुमी अभिलेख, दौंड-पुरंदर यांजकडे पुढील उचित कार्यवाहीसाठी रवाना.

७) राष्ट्रीय सुचना व माहिती प्रसारण केंद्र (NIC) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी सो. यांची स्वाक्षरी असे

(प्रल्हाद हिरामणी)
जिल्हाधिकारी पुणे करिता